नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०८/२०२५ ( शनिवार )**

---

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता बुटीबोरी पोलीसांनी काढला रूट मार्च

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद—ए—मिलाद या सणोत्सवाचा बंदोबस्त असल्याने नागपुर बुटीबोरी पोलीसांनी सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ३०/०८/२०२५ रोजी श्री दिपक अग्रवाल, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांच्या उपस्थितीत रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा पोलीस स्टेशन बुटीबोरी, एमआयडीसी चौक बुटीबोरी, मार्केट रोड ,बँक ऑफ इंडिया चौक, बुटीबोरी, संत जगनाडे चौक, जाणता राजा चौक, जुनिवस्ती तरुण युवक मंडळ पर्यंत या मार्गाने घेण्यात आला. सदर रूटमार्च मध्ये पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी, यांच्या सह पोलीस स्टेशन बुटीबोरी येथील ०४ अधिकारी १३ अंमलदार, पोलीस मुख्यालय येथील दंगा नियंत्रण पथक चे २४ अंमलदार, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण चे १५ पोलीस अंमलदार, आणि १३ गृहरक्षक हजर होते.


संत रोहीदास
कुशन वर्क्स
B Men's
STYLE KA ADDA
TAJ
AUTOMOBILE
B Men STYLE KA ADDA
EBENEZER RESTAURENT
लस्सी
25/- 25/-




## अल्पवयीन अपहृत मुलाचा घेतला शोध
## जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत फिर्यादी नामे बबनराव लक्ष्मणराव बूरे, वय ४४ वर्ष रा.थडीपवनी ता.नरखेड जि नागपूर यांनी रिपोर्ट दिली की, ३१/०७/२०२५ रोजी त्यांचा अल्पवयीन मुलगा वय १३ वर्षे याला शाळेत नियीमत जाण्याबाबत हटकल्या वरून शाळेत जातो असे सांगुन तो घरून निघुन काटोल बसस्टॉप येथे गेला. तेथे त्याला एक नातेवाईक भेटले असता त्यांना तो काकाच्या गावाला डिगडोह येथे जात आहे असे सांगून तो कोंढाळी बसने निघून गेला. फिर्यादी यांनी भाऊ नामे—दिलीप बूरे रा. डिगडोह यांना फोन करून मुलाबाबत विचारले असता मुलगा येथे आलाच नाही असे सांगितले. तेव्हा फिर्यादी यांनी शाळेत जावून चौकशी केली असता मुलगा शाळेतही गेला नसल्याचे समजले तेव्हा फिर्यादी यांनी सर्व नातेवाईकांना फोन करून करणबाबत विचारणा केली तसेच

आजूबाजूला विचारपूस केली त्याचा शोध घेतला मुलगा कुठेही मिळून आला नाही. फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस ठाणे जलालखेडा येथे अपराध क्र. ३४३/२०२५ कलम १३७ (२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला .

जलालखेडा पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करून सदर अल्पवयीन मुलाला शोधण्यासाठी ४ पथके तयार केली. दिनांक २९/०८/२०२५ रोजी जलालखेडा पोलीसांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने सदर गुन्हयातील अल्पवयीन मुलगा यांचा शोधला असता नमुद अल्पवयीन मुलगा बुटीबोरी, नागपूर परिसरात असल्याची माहीती मिळाली.जलालखेडा पोलीसानी नमुद अल्पवयीन मुलाला बुटीबोरी येथुन ताब्यात घेवुन त्यांचे आईवडीलांचे ताब्यात दिले. नमुद बालकाच्या पालकांनी जलालखेडा पोलीसांचे आभार व्यक्त केले.

## ७ महीन्यांपासुन बेपत्ता असलेल्या महीलेचा आणि तिच्या अल्पवयीन मुलाचा घेतला शोध

## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत दिनांक ३१/०१/२०२५ रोजी एक महीला आणि तिचा मुलगा बेपत्ता असल्याने मिसींग क्र. ०९/२५ अन्वये मिसींग दाखल होती. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखा यांना दोन महीन्या वरील मिसींग प्रकराणाचे तपास करण्याचे आदेश दिले असल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक माहिती आणि गोपनीय माहितीच्या आधारे मागील सात महिन्यापासून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतुन बेपत्ता महिला , वय ३० वर्ष तिचा मुलगा वय १२ वर्ष हे रामकृष्ण नगर, वाठोडा, नागपूर शहर येथे असल्याबाबत माहीती प्राप्त केली. नमुद ठिकाणी जावुन त्यांचा शोध घेतला असता नमुद महीला आणि तिचा मुलगा दोघेही मिळुन आले.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

## अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक २९/०८/२०२५ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, शिवाडौली ते अरोली या मार्गाने अवैधरित्या रेती

ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा भांडेवाडी शिवारात नाकाबंदी केली असता महीद्रा बोरेलो मॅक्सी वाहन क्र. एम.एच. ३४ एम. ८०२८ हे वाहन मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक निरजंन देवांनद मेहर, वय ३४ वर्ष रा.अरोली वार्ड १ तह.मौदा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव विचारले असता सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) महीद्रा बोरेलो मॅक्सी वाहन क्र. एम.एच. ३४ एम. ८०२८ किमती ३,००,००० /— रूपये आणि २) १ ब्रास रेती किंमती ३,०००/— रूपये असा एकुण ३,०३,०००/— रूपयेचा माल जप्त करण्यात आला.

नमुद वाहन चालक/मालक याच्या विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम **अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६४० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३०/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३० आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २९ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण ११६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३३ आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३१ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २९ आरोपी अशा एकुण ११५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने